श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-६, अंक-७ | जुलै-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## डेरवण रुग्णालयात
## बजाज फिनसर्व्ह कार्डिॲक थिएटरचे उद्घाटन

डेरवण येथील भ.क.ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र येथे ॲन्जिओप्लास्टी व ॲन्जिओग्राफी समवेतच आता कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्ट अर्थात ओपन हार्ट सर्जरीची सोय उपलब्ध झाली आहे.

दि. १३ जानेवरी २०१८ रोजी ''बजाज फिनसर्व्ह'' च्या सहकार्याने रुग्णालयात कॅथलॅब सुरू करण्यात आली आणि ''ॲन्जिओग्राफी व ॲन्जिओप्लास्टी'' ची सुविधा उपलब्ध झाली. अत्यंत अल्प शुल्क घेऊन देण्यात येणाऱ्या या सेवेचा लाभ ग्रामीण भागातील जनतेला मोठ्या प्रमाणात होत आहे.

डेरवण रुग्णालयाने आता एक पाऊल पुढे टाकून कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्ट (CABG) अर्थात बायपास सर्जरी, हृदयाच्या झडपा बदलणे व छिद्र बुजविणे आदी सोयी उपलब्ध केल्या आहेत. दि. ९ जून २०१८ रोजी ''बजाज फिनसर्व्ह कार्डिॲक थिएटर'' चे उद्घाटन मा. डॉ. प्रविण शिनगारे, संचालक, महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचलनालय यांचे हस्ते करण्यात आले.

उद्घाटन समारंभाचे वेळी संस्थेचे विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकर यांनी सन १९६९ पासूनचा, श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या स्थापनेनंतर आजपर्यंत संस्थेने सामाजिक,




*उद्घाटन करताना डावीकडून डॉ. प्रवीण शिनगारे, डॉ. सुवर्णा पाटील, कार्यकारी विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकर, मा. श्रीकाकामहाराज*




*दीपप्रज्वलन करताना मा. श्रीकाकामाहाराज, डॉ. प्रवीण शिनगारे, श्री. विकास वालावलकर साहेब, डॉ. आनंद नाडकर्णी डॉ. सुवर्णा पाटील*

वैद्यकीय व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कामाचा आढावा आपल्या प्रास्ताविक भाषणात घेतला. संस्थेचा रुग्णालय सुरू करण्यामागे केवळ पैसा मिळविणे हा उद्देश कधीच नव्हता. ट्रस्टने आजपर्यंत जे जे उपक्रम सुरू केले ते कोणाच्याही आर्थिक मदतीशिवायच केलेले आहेत. रुग्णालय सुरू झाल्यानंतर काही वर्षातच संस्थेने (येथे येणाऱ्या डॉक्टर्स व इतर कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाच्या सोयीकरता) के जी, सिनीयर के जी पासून सुरू केलेल्या शाळेत आज १२वी सायन्स पर्यंतचे शिक्षण या परिसरातील विद्यार्थी घेतात. १०वी व १२वीच्या परीक्षेत सातत्याने १००% यश मिळविणाऱ्या या शाळेतील मुलांची गुणांची टक्केवारीही अत्युत्तम श्रेणीतील आहे.

संस्थेने, कोंकणातील मुलींनी स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी बनावे, यासाठी ए.एन.एम., जी.एन.एम., पी.बी.बी. एस.सी. व एम.एस.सी. नर्सिंग या नर्सिंगच्या शिक्षणाची सोय केली. सन २००३ सालापासून टाटा कॅन्सर हॉस्पिटलच्या सहकार्याने कॅन्सरच्या उपचाराची सोय केली गेली. पॅरामेडिकल हेल्थ सायन्स, बॅचलर ऑफ पॅरामेडिकल टेक्नॉलॉजी व केंद्र शासनाच्या किमान कौशल्य विकास व रोजगर योजनेचे सर्व कोर्स सुरू करून सर्व विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय कोणतेही डोनेशन न घेता केली. एम.बी.बी.एस.चे शिक्षण देणाऱ्या ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाची सुरुवात करून कोंकणात असलेली वैद्यकीय महाविद्यालयाची उणीव दूर केली.

कुपोषणाचे मुलांवर होणारे परिणाम अतिशय गंभीर आहेत. जन्मजात शारीरिक विकृती, स्थुलत्व, मानसिक व शारिरीक आरोग्याच्या विविध समस्या या कुपोषणामुळे उद्भवतात. हे



*ऑपरेशन थिएटरची पाहाणी करताना मान्यवर*



ऑपरेशन थिएटरच्याबाहेर डावीकडून कार्यकारी विश्वस्त मा. श्री. विकासराव वालावलकर. मा. श्रीकाकामहाराज, डॉ. प्रवीण शिनगारे, डॉ. प्रणव शामराज व डॉ. सुवर्णा पाटील

लक्षात घेऊन लहान मुलांना व मातांना सकस व पौष्टिक खाणे मिळेल याकडे लक्ष दिले गेले. यासाठी अभ्यासपूर्वक प्रयत्न करून ''पौष्टिक लाडू'' तयार करण्यात आले. या लाडवाला नुकतेच ''ग्लेनमार्क फाउंडेशन मुंबई ''च्या पाककृती स्पर्धेत पारितोषिक मिळाले आहे. हे सर्व आजपर्यंत संस्थेने कोणाचीही मदत न घेता केले. मात्र वैद्यकीय महाविद्यालयाची सुरुवात झाल्यानंतर आम्ही बजाज फिनसर्व्ह या कंपनीशी सुसंवाद साधला. त्यानंतर बजाज फिनसर्व्हचे अधिकारी श्री. अजय साठेसाहेब या ठिकाणी आले. इथला सर्व सेटअप पाहिला. संस्थेचे नि:स्पृहतेने चाललेले काम, कामामागची तळमळ त्यांनी पाहिली आणि त्यांचे वरिष्ठ अधिकारी मा. श्री. सी.पी. त्रिपाठीसाहेब यांनी प्रथम कॅथलॅबसाठी व आता बायपास सर्जरीच्या ऑपरेशन थिएटरसाठी भरपूर आर्थिक सहाय्य केले. त्यांच्या भरीव आर्थिक सहकार्यामुळेच आज येथे आपण ''बजाज फिनसर्व्ह कार्डिॲक थिएटर'' चे उद्घाटन करण्यासाठी जमलो आहोत. येथे मुद्दाम नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे १३ जानेवारी २०१८ यादिवशी बजाज फिनसर्व्ह कॅथलॅब उद्घाटनप्रसंगी मा. श्री. सी.पी. त्रिपाठीसाहेब येथे आले होते. त्यावेळी त्यांनी




उद्घाटनप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना डॉ. सुवर्णा पाटील

आपल्या मनोगतात सांगितले की ''बजाज समुहाची मदत योग्य त्या कार्यासाठी योग्य त्या संस्थेकडे सुपूर्द झाली आहे याचे समाधान आहे. या ट्रस्टच्या माध्यमातून सुरू असलेली वैद्यकीय सेवा कोकणातील खेड्यापाड्यात गोरगरीब रुग्णांपर्यंत पोहोचलेली आहे ही अतिशय अभिमानास्पद गोष्ट आहे''. याच विश्वासाने बजाज समुहाने आता कार्डिॲक थिएटरसाठीही मदतीचा हात पुढे केला आहे. बजाज समुहाच्या या सहकार्यामुळेच हे आम्ही करू शकलो. याबद्दल कंपनीचे व कंपनीचे वरिष्ठ अधिकारी मा. श्री. सी.पी. त्रिपाठीसाहेब व श्री. अजय साठेसाहेब यांचे मन:पूर्वक आभार. सदगुरू श्रीदिगंबरदास महाराजांची प्रेरणा व सदगुरू श्रीकाका महाराजांचे आशीर्वाद आणि अचूक मार्गदर्शनाखालीच हे सर्व होत आहे. अशा भावना श्री. विकास वालावलकर साहेबांनी आपल्या मनोगतात व्यक्त केल्या.

संस्थेच्या वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांनी रुग्णालयामध्ये हृदयाचे उपचार व शस्त्रक्रिया माफक दरात होत असल्याचे सांगितले. कोकणातील या अद्ययावत हॉस्पिटलमध्ये गरीब रुग्णांसाठी ही मोठी सुविधा उपलब्ध असल्याचे नमूद करून रुग्णालय सुरू झाल्यापासूनच्या प्रगतीचा आलेख आपल्या मनोगतात व्यक्त केला.




डॉ. प्रवीण शिनगारे यांचे स्वागत करताना श्री. विकासराव वालावलकर, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. प्रणव शामराज.




उद्घाटनप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना संस्थेचे कार्यकारी विश्वस्त मा.श्री. विकास वालावलकर साहेब.




*उद्घाटनप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना डॉ. प्रवीण शिनगारे, संचालक, महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचलनालय*

तसेच सुरू झालेल्या बायपास सर्जरीच्या ऑपरेशन थिएटरची वैशिष्ट्ये सांगितली —

- ISO – 5 Modular O.T.
- ऑपरेशन थिएटरच्या भिंती स्टेनलेस स्टीलच्या, छत ॲल्युमिनीयम सिलिकेटचे व फ्लोअरिंग इपोक्सीचे आहे. त्यामुळे ते जंतुविरहीत राहते व ऑपरेशन थिएटरचे तापमान योग्य त्या पातळीत राहते.
- जपानी कंपनीचे ऑपरेशन टेबल.
- ऑपरेशन थिएटर मध्ये असलेले दिवे सिमॉन या जर्मन कंपनीचे असून त्यात १६ फ्लॉवर्सचे डोम असून त्यात ४८ LED लॅम्प आहेत. यामुळे प्रखर प्रकाश असूनही उष्णतेचा त्रास होत नाही. तापमानावर नियंत्रण राहते.
- हृदयाची शस्त्रक्रिया चालू असताना फुप्फुसांचे व हृदयाचे काम करणारे Maquet कंपनीचे हार्ट लंग्ज मशिन.
- TEE Scope - शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाच्या अन्ननलिकेतून दुर्बिणीद्वारे हृदयाचे छिद्र पाहण्यासाठीचे Echo Cardiography machine,
- हृदयाचे ठोके अनियमीत झाल्याने चक्कर येणे, फिट येणे असे आजार होतात त्यासाठी हृदयाचे ठोके तपासण्याचे Holter Monitor हे यंत्र,
- Air handling machine – निर्जन्तुक हवेचा प्रवाह सोडण्याचे काम हे मशिन करते त्यामुळे फिल्टर झालेली शुध्द हवा ऑपरेशन थिएटरमध्ये आल्यामुळे इन्फेक्शनची शक्यता अतिशय अल्प असते.
- भूल देण्यासाठी लागणारे Drager कंपनीचे Fabius Plus Anaesthesia machine,
- शस्त्रक्रिया सुरू असताना रक्तातील प्राणवायू, कार्बन डाय ऑक्साईड वायू यांचे प्रमाण योग्य ठेवणारे ABG Machine.
- Ultrasonic Cleaning Machine ऑपरेशन थिएटरमधील वस्तू निर्जन्तुक करण्यासाठी.
- पेसमेकर (तात्पुरता किंवा कायमस्वरूपी)

हि सर्व अद्ययावत यंत्रसामग्री आहेच. त्याशिवाय हृदयरोग तज्ज्ञ डॉ. प्रणव शामराज हे ही २४ तास उपलब्ध आहेत. त्याच समवेत पूर्णवेळ नर्सिंग स्टाफ, कॅथलॅब टेक्निशिअन, रेडिओग्राफर व उत्तम प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी आहेत, हे ही नमूद केले.

बायपास सर्जरीच्या कार्यात आपले बहुमोल योगदान देणार असलेले डॉ. आनंद नाडकर्णी (कार्डिॲक सर्जन) म्हणाले की माझे भाग्य आहे की मी या संस्थेत माझे योगदान देणार आहे. यासाठी या रुग्णालयाचे कार्डिऑलॉजिस्ट डॉ. प्रणव शामराज हे ही माझ्यासमवेत उपस्थित आहेत. या रुग्णालयात असलेल्या सेवा सुविधा अतिशय उत्तम आहेत.

"या रुग्णालयाचे विश्वस्त हे रुग्णालयाच्या नफातोट्याचा विचार न करता रुग्णांना अतिशय अल्प दरात, बऱ्याच सोयीसुविधा देऊन रुग्णसेवा करतात ही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. या रुग्णालयाला कोणतीही गोष्ट कधीच कमी पडणार नाही कारण या ठिकाणी सेवा केली जाते. सन २००६ यावर्षी मी या ठिकाणी आलो होतो तेव्हापासून आजपर्यंत घेतलेला रुग्णसेवेचा ध्यास, चाललेले समाजोपयोगी कार्य आणि इथून पुढे होणारी रुग्णसेवा व समाजकार्यास माझ्या अनंत शुभेच्छा आहेत. आज या ठिकाणी आपण मला बोलावले. या योग्यतेचा मी आहे की नाही हे मला माहीत नाही. मला या शुभकार्यासाठी बोलावले. हे मी माझे भाग्यच समजतो. आपल्या रुग्णालयात कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे अथक परिश्रम वाखाणण्याजोगेच आहेत. रुग्णालयाच्या यापुढे होणाऱ्या प्रगतीस शुभेच्छा!" असे विचार या समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. डॉ. प्रवीण शिनगारे, संचालक, महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यानी आपल्या मनोगतात व्यक्त केले.



*ऑपरेशन थिएटर संबंधी माहिती देताना डॉ. आनंद नाडकर्णी कार्डिॲक सर्जन यांचे सहाय्यक व मान्यवर*




*उद्‌घाटनप्रसंगी आपले विचार व्यक्त करताना*
*डॉ. आनंद नाडकर्णी, कार्डिॲक सर्जन*



*कार्डिॲक थिएटरच्या उद्‌घाटन समारंभाला उपस्थित मान्यवर*

या समारंभाला संस्थेचे मुख्य विश्वस्त मा. श्री काकामहाराज, कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, श्री. बाळासाहेब काजरेकर, रुग्णालयातील सर्व डॉक्टर्स, परिचारीका, व अन्य सेवक वर्ग, ग्रामस्थ उपस्थित होते.

# सुप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. अरविंद नातू यांना ‘‘ऑर्डर ऑफ मेरिट’’ सन्मान



*‘‘ऑर्डर ऑफ मेरिट’’ सन्मानचिन्ह*

फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनीतर्फे दिला जाणारा ‘‘ऑर्डर ऑफ मेरिट’’ हा सन्मान, सुप्रसिद्ध वैज्ञानिक डॉ. अरविंद नातू यांना नुकताच जर्मनीचे भारतातील काउन्सल जनरल डॉ. योरेन मारहार्ड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. भारत आणि जर्मनी या दोन राष्ट्रातील परस्पर संबंध मजबूत करण्यात डॉ. नातू यांनी केलेल्या भरीव कामगिरीच्या सन्मानार्थ हा पुरस्कार देण्यात आला. विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रात काळाबरोबर अनेक बदल होत आहेत. या बदलांना सामोरे जाण्यासाठी तरुण विद्यार्थ्यांना आपण मार्गदर्शन करणारा आहोत तसेच उभय राष्ट्रातील संबंध अधिक सौहार्द्राचे करण्यासाठी झटणार आहोत असे डॉ. नातू यांनी या वेळी सांगितले. श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या कार्यात विशेष सहकार्य करणाऱ्या डॉ. नातू यांना जर्मनीचा हा परदेशी नागरिकांसाठी असलेला सर्वोच्च सन्मान मिळाल्याबद्दल श्रीकाकामहाराज जोशी यांनी एका अनौपचारिक भेटीदरम्यान त्यांचा सत्कार करून हार्दिक अभिनंदन केले.



*श्रीकाकामहाराज जोशी डॉ. नातू यांचा सत्कार करताना, सोबत सौ. नातू*

# डेरवण प्रशालेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाची माध्यमिक शाळा व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ने दहावी व बारावी परीक्षेत सातत्याने ११ वर्षे १००% यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. यावर्षी इयत्ता दहावीतील विद्यार्थी वेद पटेल याने १००% गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा बहूमान प्राप्त केला आहे. साक्षी सुवारे हिने ९६.८०% व प्रेमसागर चव्हाण याने ९५.२०% गुण मिळवत प्रशालेत द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. एकूण प्रविष्ट ५२ विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थ्यांनी ९०% हून अधिक गुण प्राप्त केले आहेत.




*विद्यार्थी गुणगौरव समारंभात मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुण्या डॉ. संयोगिता नाडकर्णी. यावेळी संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकासराव वालावलकर, शाळा संचालिका सौ. शरयू यशवंतराव, मुख्याध्यापिका श्रीमती. प्रज्ञा पारकर, श्री. कल्पेश जुवेकर व श्रीमती उज्वला जुन्नरकर उपस्थित होते.*




*शाळेत प्रथम आलेल्या विद्यार्थी वेद पटेल याचा सत्कार करताना प्रमुख पाहुण्या डॉ. संयोगिता नाडकर्णी*

इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील संचिता चव्हाण या विद्यार्थीनीने ८२% गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. सुरभी वैद्य हिने ७९.६९% व निलाक्ष नेरूरकर याने ७७.६९% गुण मिळवत प्रशालेत द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले.

संस्थेच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव समारंभ आयोजित करून गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिके देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कौतुकसोहळ्याला पुणे येथील प्रसिध्द मानसोपचारतज्ज्ञ डॉ. संयोगिता नाडकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या. संस्थेचे कार्यकारी विश्वस्त श्री. विकास वालावलकर यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रास्ताविक शाळेच्या संचालिका शरयू यशवंतराव यांनी केले.

प्रशालेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थी तसेच प्रत्येक विषयातील प्रथम आलेले विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगताद्वारे शाळेबद्दल कृतज्ञता व सत्काराबद्दल आभार व्यक्त केले.

या प्रसंगी प्रमुख पाहुण्या डॉ. संयोगिता नाडकर्णी यांनी आपल्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, किशोरवयामध्येच आपले व्यक्तिमत्त्व घडत असते. त्यामुळे कोणताही निर्णय घेताना तो विवेकबुध्दीनेच घ्यावा, चांगले मित्र शोधावेत, कोणत्याही प्रसंगांना सामोरे जाण्याची तयारी ठेवावी, चुकीचे मित्र आपल्याला व्यसनाधिन करू शकतात. पालकांशी संवाद साधावा याबरोबरच सुंदर आयुष्य घडविण्यासाठी डोळ्यांसमोर आदर्श व्यक्ती ठेवाव्यात असेही त्या म्हणाल्या.

या कार्यक्रमाला विद्यार्थी, तसेच पालकवृंद आणि शिक्षकवृंद उपस्थित होता. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टचे विश्वस्त, शाळेच्या संचालिका, मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी अभिनंदन केले. सामुहिक 'वंदे मातरम्' गायनाने या कायक्रमाची सांगता झाली.



*विद्यार्थी गुणगौरव समारंभाला उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व पालकवृंद*

# डेरवण क्रीडासंकुलात ॲथलेटिक्स प्रशिक्षण शिबिर संपन्न

विद्यानिकेतन इंग्लिश मिडियम स्कूल साखराळे, इस्लामपूर आणि रत्नागिरी जिल्ह्यातील इच्छुक खेळाडूंचे निवासी प्रशिक्षण शिबिर डेरवण येथील 'एसव्हीजेसिटी' क्रीडासंकुलात २ जून ते १२ जून २०१८ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण शिबिरात कासेगाव येथील ५२ आणि रत्नागिरी जिल्ह्यातील ४० असे एकूण ९२ विद्यार्थी सहभागी झाले होते. कोल्हापूर येथील ज्येष्ठ प्रशिक्षक श्री. सुभाष पवार यांनी तसेच बालेवाडी संकुलातील प्रशिक्षक श्री. महेश पाटील यांनी सहभागी खेळाडूंकडून कसून सराव करून घेतला. या शिबिरातील सहभागी खेळाडूंना धावणे, लांब उडी, उंच उडी, गोळाफेक, थाळी फेक, अडथळ्यांची शर्यत या सर्व क्रीडा प्रकारांचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण देण्यात आले.

डेरवण येथे सराव करणे हे नेहमीच सर्व खेळाडूंना नवी उर्जा देणारे असते. येथे शालेय वर्षाच्या सुरवातीस केलेला सराव आम्हाला वर्षभर यश देण्यासाठी उपयुक्त ठरतो अशा भावना यावेळी विद्यानिकेतन शाळेचे क्रीडा प्रशिक्षक श्री. कुमार शिंदे यांनी व्यक्त केले. येथील सिंथेटिक ट्रॅक, जिम, आणि स्विमिंग पूल या सर्वच सुविधा अत्याधुनिक असल्यामुळे खेळाडूंना राष्ट्रीय शिबिरातच आल्यासारखे वाटते आणि त्याचा खेळाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून कौशल्य आणि कामगिरी सुधारण्यास वेग मिळतो असे श्री. सुभाष पवार यांनी सांगितले. याचबरोबर शिबिराच्या समारोप प्रसंगी आवर्जून उपस्थित असलेले कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव श्री. एन. व्ही. टोणपे यांनी डेरवण संकुलाचे आभार मानून सलग तिसऱ्या वर्षी विनामूल्य मैदान उपलब्ध करून केवळ खेळ आणि खेळाडू यांच्या प्रगतीसाठी कटिबद्ध असलेल्या या संस्थेचे आम्ही कायम ऋणी राहू आणि आमच्या खेळाडूनी मिळविलेले प्रत्येक पदक हे डेरवण संकुलामुळेच असेल यात शंका नाही अशा भावना व्यक्त केल्या.

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com



*निवासी प्रशिक्षण शिबीर*

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

## पुणे व मुंबई येथून जुलै २०१८ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| | डॉ. भारती खांडेकर, मुंबई (प्लॅस्टीक सर्जन) | दुभंगलेले टाळ व ओठ शस्त्रक्रिया तज्ज्ञ |
| २०/२१ जुलै | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| २१ जुलै | डॉ. श्रीपाद बाणवली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| २१ जुलै | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (प्लॅस्टिक सर्जन) | भाजलेले व्रण, डाग शस्त्रक्रिया व उपचार |
| २२ जुलै | डॉ. के.मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाच्या विशेषज्ज्ञ व उपचार |
| २९ जुलै | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजिस्ट) | पोटाच्या विकाराचे तज्ज्ञ |
| २९ जुलै | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रियांचे तज्ज्ञ |
| ०५ ऑगस्ट | डॉ. के.एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| ०५ ऑगस्ट | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रूग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**

**डोहाळेजेवण व सासू सून मेळावा –** १४ जुलै – वालावलकर रुग्णालय येथे, १५ जुलै – RHTC येथे
**सहा महिन्यांचे वाढदिवस –** २५ जुलै – RHTC येथे, २१ जुलै – वालावलकर रुग्णालय येथे,
**सरपंच मेळावा –** २२ जुलै

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे–३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर